# महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र

## विद्या विकास मंडळाचे सीताराम गोविंद पाटील कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय साक्री (धुळे)

## करिअर कट्टा उपक्रम

## अहवाल- १ मार्च २०२१ ते ३१ डिसेंबर २०२१5

**महाराष्ट्र शासन तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य** यांच्याकडून प्राप्त पत्रानुसार महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या अंतर्गत करिअर कट्टा हा उपक्रम राज्यातील संपूर्ण महाविद्यालयात राबविण्याचे ठरले. त्यानुसार आमच्या महाविद्यालयात करिअर कट्टाची स्थापना करण्यात आली.**महाविद्यालयीन करिअर कट्टा समन्वयक म्हणून डॉ एस.आर.गोवर्धने यांची नियुक्ती** करण्यात आली त्या अंतर्गत **आय.ए. एस .आपल्या भेटीला यासाठी डॉ एस.आर.गोवर्धने व उद्योजक आपल्या भेटीला यासाठी प्रा.मुकेश वळवी यांची समन्वयक म्हणून नियुक्ती** करण्यात आली

- **महाविद्यालयात करिअर कट्टा या उपक्रम अंतर्गत महाविध्यालायातील व परिसरातील मुलांपर्यंत करिअर कट्टा हा उपक्रम पोहचावा यासाठी अनेक उपक्रम महाविध्यालायामार्फात राबविले त्याचा संशिप्त अहवाल पुढीलप्रमाणे**

1. **दिनांक ०७/०७/२०२१ वार बुधवार** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र आणि वि. वि. मंडळाचे सी गो. पाटील कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय साक्री (धुळे) यांच्या सयुक्त विद्यमाने **परिसरातील प्राचार्य आणि महाव्द्यालयीन समन्वयकयांची ऑनलाइन सहविचार सभा** आयोजित केली.

**प्रास्ताविक-** प्रा. डॉ. सचिन नांद्रे

**प्रमुख मार्गदर्शक-** मा. यशवंत शितोळे, अध्यक्ष महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र

**अध्यक्ष-** प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे

**प्रमुक अतिथी-** डॉ. ए. बी. पाटील उपप्राचार्य

**आयोजक-** प्रा. डॉ. एस. आर. गोवर्धने

**प्रा**. डॉ. डी .एस. चव्हाण

2. **दिनांक १८/०८/२०२१ वार बुधवार** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र आणि साक्री तालुक्यातील सर्व महाविद्यालये यांच्या सयुक्त विद्यमाने **करिअर कट्टा आपल्या दारी ऑनलाइन सहविचार सभा** आयोजित केली.

**प्रास्ताविक-** प्रा. डॉ. सचिन नांद्रे

**प्रमुख मार्गदर्शक-** मा. यशवंत शितोळे, अध्यक्ष महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र

**अध्यक्ष-** प्राचार्य डॉ. एस.टी सोनवणे

**प्रमुक अतिथी-** प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे
प्राचार्य डॉ.डॉ.ए.पी.खैरनार
प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे
प्राचार्य डॉ.सुरेश अहिरे
प्राचार्य डॉ.शिवाजी पाटील

**आयोजक-** प्रा. डॉ.सचिन गोवर्धने
प्रा. के.डी.कदम
प्रा. डी बी भामरे
प्रा. अजबराव इंगळे
प्रा. शरद सोनवणे



# लक्ष महाराष्ट्र

शुक्रवार,
दि. २० ऑगस्ट २०२१

## 'करिअर कट्टा आपल्या दारी' विषयावर सहविचार सभा

दहिवेल । महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती सहाय्यता केंद्र, उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय दहिवेल, सी.गो.पाटील महाविद्यालय साक्री, विमलबाई पाटील महाविद्यालय साक्री, जे.के. शाह आदर्श महाविद्यालय निजामपूर व के. आर डी. देवरे महाविद्यालय म्हसदी यांच्या संयुक्त विद्यमाने करीयर कट्टा आपल्या दारी ऑनलाईन सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले.

सभेचे प्रमुख मार्गदर्शक महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे, प्राचार्य डॉ ए.पी.खैरनार, प्राचार्य डॉ.आर आर अहिरे यांनी करीयर कट्ट्याला शुभेच्छा देत विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ एस टी.सोनवणे यांनी करीयर कट्ट्याचा वापर विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवेल असे सांगितले तर प्राचार्य डॉ.पी.एस सोनवणे यांनी विद्यार्थ्यांची सर्वांगीण विकासात रा. से.यो.चे कार्य अधोरेखित केले. प्राचार्य डॉ सुरेश अहिरे यांनी तीन ते पाच वर्षांच्या कालावधीत करीयर कट्ट्याचे विद्यार्थी हे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी पार पडतील तर आपण खऱ्या अर्थाने करीयर कट्टा यशस्वी झालं असे म्हणू, असे सांगताना महाविद्यालयातर्फे उच्च शिक्षण विभाग व माहिती तंत्रज्ञान विभागाचे आभार मानले. या कार्यक्रमाला पिंपळनेर महाविद्यालयाचे समन्वयक के. डी.कदम, प्रा डॉ. डी.बी.भामरे म्हसदी, प्रा. डॉ सचिन गोवर्धने साक्री, प्रा डॉ शरद सोनवणे साक्री , प्रा डॉ.अजबराव इंगळे, म्हसदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शिवाजीराव पाटील हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करीयर कट्ट्याचे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ सचिन नांद्रे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा डॉ अजबराव इंगळे यांनी केले तर आभार प्रा डॉ सचिन गोवर्धने यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner



# देशदूत पांझराकान खोरे...

सोमवार, दि.२३ ऑगस्ट २०२१ (८)

## 'करिअर कट्टा' मुळे मिळणार विधायक दिशा

### यशवंत शितोळे यांचे प्रतिपादन; राज्यात उपक्रमाचा पहिला मान धुळे जिल्ह्याला

■ धुळे । प्रतिपादन

उज्ज्वल भविष्याची मोठी स्वप्न पाहणाऱ्या महाविद्यालयीन तरुण, तरुणींच्या करिअरला शासनाच्या करिअर कट्टा, या उपक्रमामुळे विधायक दिशा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यक केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी केले.

यातच्या अनुषंगाने साक्री करताना महाराष्ट्रातील ४५ हजार विद्यार्थ्यांपर्यंत करिअर कट्टा पोहोचला पाहिजे म्हणून पहिला मान धुळे जिल्हाला मिळाला. करिअर कट्टा आपल्या दारी या ऑनलाईन सहविचार सभेत ते बोलत होते. श्री. शितोळे पुढे म्हणाले की, महाराष्ट्र राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यक केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करियर कट्टा, अंतर्गत आयएएस आपल्या भेटीला व उद्योजक आपल्या भेटीला हे दोन महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. करिअर कट्टा या उपक्रमात आयएएस आपल्या भेटीला या कार्यक्रमाद्वारे देशातील प्रशासकीय सेवेतील उच्चपदस्थ अधिकारी राज्यभरातील तरुण तरुणींसमोर आपले अनुभव मांडणार असून स्पर्धा परीक्षेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यास त्यातून हातभार लागणार आहे. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग आणि भारतीय प्रशासकीय सेवेच्या विविध स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी यापुढे पुणे, दिल्लीला जाण्याची गरज राहणार नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थीही पुढे आला पाहिजे, असा हा उपक्रम आहे. स्पर्धा परीक्षेतील यश हेच एकमेव करिअर नाही आणि कोणताही अपयश हे अंतिम नाही. जीवन अतिशय सुंदर आहे, प्रत्येकाची इथे असण्याची एक निश्चित अशी भूमिका आहे, त्या भूमिकेपर्यंत पोहोचण्यासाठी युवकांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करण्याची गरज आपल्या सर्वांमध्ये आहे. पालकांच्या सहकार्याने युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी आपण एकजुटीने प्रयत्न करूया. युवकांनी लढले पाहिजे, घडले पाहिजे आणि घडवले पाहिजे, आपण सर्वजण मिळून करिअर कट्ट्याच्या माध्यमातून हाच एक प्रयत्न करावयाचा असल्याचेही त्यांनी सांगितले.

ही कार्यक्षमता आणि ऊर्जेचा प्रचंड मोठा साठा असणारा हा युवावर्ग केवळ मार्गदर्शनाच्या अभावामुळे आयुष्यातील उमेदीची वर्षे वाया घालवतो, तर काही वेळेला संपूर्ण आयुष्य वाया घालवतो. आपण डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या प्रेरणेने एकत्र आलेले सर्व दिग्गज प्रशासकीय अधिकारी, मंत्री उदय सामंत यांच्या मार्गदर्शनाने सक्रिय असणाऱ्या उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सर्व पदाधिकारी, प्राचार्य व महाविद्यालयीन समन्वयक सर्वांनी एकत्र प्रयत्न करू या, असेही श्री. शितोळे यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करिअर कट्ट्याचे जिल्हा समन्वयक डॉ. सचिन नांद्रे यांनी केले. कार्यशाळेत प्राचार्य डॉ. आर.आर. अहिरे, प्राचार्य डॉ. एस.टी सोनवणे, प्राचार्य डॉ. ए.पी.खैरनार, प्राचार्य डॉ.पी.एस. सोनवणे, प्राचार्य डॉ.सुरेश अहिरे, प्राचार्य डॉ.शिवाजी पाटील, प्राचार्य डॉ. पी.एच.पवार, प्राचार्य डॉ.मनोहर पाटील, प्राचार्य डॉ.दिलीप पाटील, प्राचार्य डॉ.पुष्पा गावित, प्राचार्य डॉ. राजेंद्र शिंदे, प्राचार्य डॉ. के.बी. पाटील, प्राचार्य डॉ.एस.आर. पाटील, प्राचार्य डॉ.के.डी.गिरासे, प्राचार्य डॉ. व्ही.एम.पाटील, प्राचार्य डॉ.मोहन पाटील, प्राचार्य डॉ.दीपक बनोत, प्राचार्य डॉ.तुषार पाटील, प्राचार्य डॉ. समाधान पाटील, प्राचार्य डॉ.पी.पी. सूर्यवंशी, प्राचार्य डॉ.डी.आर.पाटील, प्राचार्य डॉ.व्ही.एम.पाटील आदींनी सहभागी होऊन मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचे आयोजन धुळे जिल्हा समन्वयक प्रा.डॉ.सचिन नांद्रे यांनी केले होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.इंगळे, डॉ.सचिन गोवर्धने, प्रा.डॉ. संभाजी पाटील, प्रा.डॉ. आर.आर. गावित, प्रा.डॉ. राजेंद्र वाघुळे, प्रा.डॉ.सिद्धार्थ सोनवणे, प्रा. डॉ. गोकुळ पाटील, प्रा.ललित पाटील, प्रा. डॉ.निशा पाटील, प्रा.डॉ.दीपक पाटील यांनी परिश्रम घेतले.

#### संधीचे सोने करा

ग्रामीण भागातील आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये परिश्रम करण्याची वृत्ती व ज्ञान मुबलक प्रमाणात असते. या ज्ञानाला व परिश्रमाला योग्य मार्गदर्शनाची व संधीची आवश्यकता असते. ही संधी उद्या मार्गदर्शन करीयर कट्ट्याच्या माध्यमातून होत असल्याने स्पर्धा परीक्षांमध्ये अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या यश संबंधी आशादायी वातावरण निर्माण होताना दिसत आहे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे यांनी केले . विद्यार्थ्यांनी देखील या मार्गदर्शनाचा लाभ घेऊन संधीचे सोने करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

Scanned with CamScanner

3. **दिनांक ०५/१०/२०२१** आमच्या महाविद्य्लायातील **शिंदे अतुल प्रकाश** या विद्यार्थ्याची **UPSC च्या** स्टडी मटेरियलसाठी नियुक्ती झाली.

4. **दिनांक १९/११/२०२१** रोजी महाविद्यालयातील **करिअर कट्टा** Brand Ambassador **म्हणून कु.वेंदे पूजा संजय व कु.दुसाने सागर शिवाजी यांची नियुक्ती** करण्यात आली.

5. **दिनांक २६/११/२०२१** रोजी आमच्या महाविद्यालयाची करिअर कट्टा उपक्रम अंतर्गत सुरु असलेल्या **मॉडेलकौशल्य विकास केंद्रासाठी निवड** झाली.

6. **दिनांक २६/१०/२०२१** वार मंगळवार रोजी **महाविद्यालयातील विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना** करिअर कट्टा उपक्रमची माहिती दिली

**मार्गदर्शक-** प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे.

**आयोजक-** डॉ.सचिन गोवर्धने

प्रा. मुकेश वळवी

प्रा. संदीप कदम







7. दिनांक ०७/१२/२०२१ वार मंगळवार महाविद्यालयात करिअर कट्टा फलक अनावरण समारंभ

प्रास्ताविक- प्रा.डॉ.एस.आर.गोवर्धने

**उद्घाटक-** माजी प्राचार्य डॉ.डी.एल.तोरवणे, प्रशासकीय अधिकारी, वि.वि.मंडळाचे सी गो पाटील कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय साक्री धुळे

**मार्गदर्शक-** प्रा.डॉ.सचिन नांद्रे

**अध्यक्ष-** प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे .


**आयोजक-** डॉ.सचिन गोवर्धने

प्रा. मुकेश वळवी

प्रा. संदीप कदम





महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग
आणि
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
महाराष्ट्र शासन
MITSC
करिअर कट्टा
युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी
महाविद्यालय कोड
A 31
महाविद्यालयाचे नाव : वि.वि.मंडळाचे सी.गो.पाटील कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय साक्री ता.साक्री जि.धुळे
महाविद्यालयीन समन्वयकाचे नाव : प्रा.डॉ.सचिन राणू गोवर्धने 9823969165
करिअर कट्टा अंतर्गत उपक्रम
● IAS आपल्या भेटीला ● उद्योजक आपल्या भेटीला
● भारतीय संविधानाचे पारायण
● वृत्तवेध स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी
● फाऊंडेशन कोर्स–स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी
● सायबर सेक्युरिटी कोर्स–तांत्रिक शाखेतील (टेक्निकल) विद्यार्थ्यांसाठी
● ई–फायलिंग कोर्स–वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी
खालील कोड स्कॅन करा
करिअर कट्टामध्ये विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करण्यासाठी
SCAN ME
यूट्यूबवरील उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी सबस्क्राईब करा
Subscribe me
नियमित उपक्रमाची माहिती मिळवण्यासाठी सबस्क्राईब करा
Subscribe me
हेल्पलाइन नंबर : ७५०७६५२५५५
महाविद्यालयीन समन्वयक प्रा.डॉ.सचिन राणू गोवर्धने

पुण्यनगरी

# सी.गो. पाटील महाविद्यालयात करिअर कट्टा फलक अनावरण

**साक्री** : महाविद्यालयीन तरुणांना स्पर्धा परीक्षा संबंधीचे मार्गदर्शन करत असतानाच उपलब्ध रोजगाराच्या विविध संधीच्या माहितीचे दालन उभे करण्याचे कार्य करियर कट्टयाच्या माध्यमातून केले जात आहे. त्याचा जास्तीत जास्त महाविद्यालयीन तरुणांनी फायदा घ्यावा असे प्रतिपादन विद्या विकास मंडळाचे प्रशासकीय अधिकारी डॉ.डी.एल.तोरवणे यांनी केले. ते महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र तसेच विद्या विकास मंडळाचे सी.गो. पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने करियर कट्टाच्या फलक अनावरणप्रसंगी म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे होते.प्रमुख पाहुणे म्हणून कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव विभागीय समन्वयक डॉ सचिन नांद्रे, उपप्राचार्य डॉ.अनंत पाटील, महाविद्यालयीन करियर कट्टा समन्वयक डॉ सचिन गोवर्धने, आय क्यू ए सी समन्वयक डॉ ज्ञानेश्वर चव्हाण, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. डी पी पाटील व महाविद्यालयातील इतर प्राध्यापक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.



विभागीय समन्वयक डॉ सचिन नांद्रे म्हणाले, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हा करियर कट्टा या उपक्रमाचा प्रमुख ध्यास आहे. आय ए एस आपल्या भेटीला, उद्योजक आपल्या भेटीला, सायबर सेंक्युरिटी सेल, आवाजाची कार्यशाळा , संविधानाचे पारायण अशा करियर कट्टा च्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना योग्य संधी पर्यंत पोहचवणे व यशस्वी जीवन व्यतीत करण्यासाठी सक्षम करण्याचे कार्य या कट्टयाच्या माध्यमातून होत असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ.राजेंद्र अहिरे यांनी करिअर कट्टयाच्या उपक्रमाची माहिती दिली. डॉ.डी. एल तोरवणे यांनी लाडे पायल सोमनाथ व भोसले गायत्री संतोष या गरजू विद्यार्थ्यांची फी भरून करियर कट्टयात सहभागी होण्यास मदत केली. कार्यक्रमाचे संचालन करियर कट्टा समन्वयक सचिन गोवर्धने यांनी केले.

**Smart Dhule**
Page No.4 December 10, 2021



साक्री : करिअर कट्टयाच्या फलक अनावरणप्रसंगी उपस्थित डॉ. डी. एल. तोरवणे, प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे.

# पाटील महाविद्यालयात करिअर कट्टा फलक अनावरण

**सकाळ वृत्तसेवा**

म्हसदी, ता. ९ : महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र तसेच साक्रीत विद्या विकास मंडळाच्या सी. गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय यांच्यातर्फे करिअर कट्टा फलक अनावरण करण्यात आले. या वेळी विद्या विकास मंडळाचे प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. एल. तोरवणे, प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे अध्यक्षस्थानी होते.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे विभागीय समन्वयक डॉ. सचिन नांद्रे, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, करिअर कट्टा समन्वयक डॉ. सचिन गोवर्धने, आयक्यूएसीचे समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. डी. पी. पाटील उपस्थित होते. महाविद्यालयीन तरुणांना स्पर्धा परीक्षांसंबंधीचे मार्गदर्शन करत असतानाच उपलब्ध रोजगाराच्या विविध संधींच्या माहितीचे दालन उभे करण्याचे कार्य करिअर कट्ट्याच्या माध्यमातून केले जात असून, त्याचा जास्तीत जास्त महाविद्यालयीन तरुणांनी फायदा घ्यावा, असे आवाहन डॉ. तोरवणे यांनी केले. करिअर कट्टा समन्वयक सचिन गोवर्धने यांनी सूत्रसंचालन केले.

# सी.गो.पाटील महाविद्यालयात करिअर कट्टा फलक अनावरण

■ पिंपळनेर । वार्ताहर

साक्रीतील सि.गो.पाटील महाविद्यालयात करीयर कट्टा फलकाचे अनावरण डॉ. डी. एल.तोरवणे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र आहिरे हे होते. महाविद्यालयीन तरुणांना स्पर्धा परीक्षेबाबत मार्गदर्शन करत असतांनाच उपलब्ध रोजगाराच्या विविध संधींच्या माहितीचे दालन उभे करण्याचे कार्य करियर कट्ट्याच्या माध्यमातून केले जात आहे. त्याचा जास्तीत जास्त महाविद्यालयीन तरुणांनी फायदा घ्यावा, असे आवाहन विद्या विकास मंडळाचे प्रशासकीय अधिकारी डॉ. तोरवणे यांनी यावेळी केले.



अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव विभागीय समन्वयक डॉ.सचिन नांद्रे, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, महाविद्यालयीन करियर कट्टा समन्वयक डॉ. सचिन गोवर्धने, आयक्यूएसी समन्वयक डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा.डी.पी.पाटील आदी उपस्थित होते. डॉ.सचिन नांद्रे म्हणाले की, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हा करियर कट्टा या उपक्रमाचा प्रमुख ध्यास आहे. आयएएस आपल्या भेटीला, उद्योजक आपल्या भेटीला, सायबर सीक्युरिटी सेल, आवाजाची कार्यशाळा, संविधानाचे पारायण अशा करियर कट्टाच्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना योग्य संधीपर्यंत पोहचवणे व यशस्वी जीवन व्यतीत करण्यासाठी सक्षम करण्याचे कार्य या कट्ट्याच्या माध्यमातून होत असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

डॉ.राजेंद्र अहिरे यांनी करीअर कट्ट्याच्या माध्यमातून विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना संधीसाक्षर करण्याचे कार्य महाविद्यालयात केले जात आहे. याचाच परिपाक म्हणून महाराष्ट्रातील महाविद्यालयातून मॉडेल कौशल्य विकास केंद्रासाठी निवड केलेल्या ५१ महाविद्यालयात सी. गो. पाटील महाविद्यालय, साक्री व उत्तमराव पाटील महाविद्यालय, दहिवेल यांची निवड अभिमानास्पद असल्याचे मत त्यांनी प्रसंगी व्यक्त केले. विद्या विकास मंडळाचे प्रशासकीय अधिकारी डॉ.डी.एल.तोरवणे यांनी लाडे पायल सोमनाथ व भोसले गायत्री संतोष या गरजू विद्यार्थ्यांची फी भरून करियर कट्ट्यात सहभागी होण्यास मदत केली. कार्यक्रमाचे संचालन सचिन गोवर्धने यांनी केले.

8. दिनांक १७/१२/२०२१ वार शुक्रवार एन.एस.एस. च्या विद्यार्थ्यांना **करिअर कट्टा** या उपक्रमाची सविस्तर माहिती दिली.

प्रास्ताविक- प्रा. संदीप कदम

मार्गदर्शक- प्रा.डॉ.एस.आर.गोवर्धने

अध्यक्ष- प्रा.डॉ.व्ही बी.बच्छाव

आयोजक- प्रा. व्ही बी.भामरे कार्यक्रम अधिकारी






# साक्रीतील पाटील विद्यालयात करियर कट्ट्याविषयी मार्गदर्शन



**साक्री, दि.१९– विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासा संबंधी मार्गदर्शना सोबतच विविध क्षेत्रातील उपलब्ध संधींविषयी ज्ञात करण्याचे काम करियर कट्ट्याच्या माध्यमातून केले जाते, असे मत महाविद्यालयीन करियर कट्टा समन्वयक डॉ.सचिन गोवर्धने यांनी व्यक्त केले.**

विद्या विकास मंडळाचे सि.गो. पाटील महाविद्यालय साक्री येथे राष्ट्रीय सेवा योजनाच्या एक दिवशीय शिबिरात करियर कट्टा याविषयी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.अनंत पाटील होते. डॉ.ए.पी. सोनवणे, डॉ.व्ही.बी. बच्छाव उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने चालणाऱ्या करियर कट्टा उपक्रमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी चालविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची व विविध क्षेत्रातील रोजगाराविषयी घेतल्या जाणाऱ्या माहिती उपक्रमांची ओळख डॉ.सचिन गोवर्धने यांनी प्रसंगी विद्यार्थ्यांना करून दिली. अध्यक्षीय समारोपात डॉ.अनंत पाटील यांनी करियर कट्टा उपक्रमाअंतर्गत उपलब्ध विविध संधींचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आव्हान केले. कार्यक्रमाचे संचलन राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.विश्वास भामरे यांनी तर आभार डॉ.चंद्रकांत कढरे यांनी केले. प्रसंगी कार्यक्रमास महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

**शब्दकोडे क्र**

---

**लोकमत**

# ‘करिअर कट्टा’ उपयुक्त :गोवर्धने

लोकमत न्यूज नेटवर्क

**साक्री** : करियर कट्टा हा विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयुक्त उपक्रम असल्याची माहिती प्रा.सचिन गोवर्धने यांनी दिली.

येथील विद्या विकास मंडळाचे सि.गो. पाटील महाविद्यालय साक्री येथे राष्ट्रीय सेवा योजना च्या एक दिवशीय शिबिरात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील होते.डॉ. ए. पी. सोनवणे, डॉ.व्ही. बी. बच्छाव प्रसंगी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने चालणाऱ्या करियर कट्टा उपक्रमातून विद्यार्थ्यांसाठी चालविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची व विविध क्षेत्रातील रोजगाराविषयी घेतल्या जाणाऱ्या माहिती उपक्रमांची ओळख डॉ सचिन गोवर्धने यांनी प्रसंगी विद्यार्थ्यांना करून दिली.

Hello Dhule
Page No. 3 Dec 18, 2021
Powered by: erelego.com

9. दिनांक २४/१२/२०२१ वार शुक्रवार एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांना **करिअर कट्टा** या उपक्रमा अंतर्गत उद्योजकीय कौशल्य या विषयावर आयोजित कार्यक्रमाचे आयोजन

प्रास्ताविक- प्रा. डॉ.एस.आर.गोवर्धने

मार्गदर्शक- प्रा.डॉ.ए.पी.सोनवणे

अध्यक्ष- प्रा.डॉ.पी.एस.साळुंखे

आयोजक- प्रा. डॉ.एस.आर.गोवर्धने






**लोकमत**

# 'उद्योजकीय कौशल्य' विषयक मार्गदर्शन

## साक्री : सि.गो. पाटील महाविद्यालयात करिअर कट्टा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**साक्री** : येथील सि.गो. पाटील महाविद्यालयात करिअर कट्टा उपक्रमांतर्गत एनसीसीच्या विद्यार्थ्यांना 'उद्योजकीय कौशल्य' या विषयावर वाणिज्य विभागप्रमुख डॉ.अशोक सोनवणे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ.पी.एस. साळुंखे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ.ए.पी. निकम, महाविद्यालयीन करिअर कट्टा समन्वयक प्रा.डॉ.एस.आर. गोवर्धने आदी उपस्थित होते.

यशस्वी उद्योजक होण्यासाठी 'हार्ड व सॉफ्ट'ही प्रमुख कौशल्ये जवळ असणे आवश्यक आहे, असे मत डॉ. सोनवणे यांनी व्यक्त केले. महाविद्यालयीन करिअर कट्टा समन्वयक प्रा. डॉ. सचिन गोवर्धने यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षीय समारोपात प्रा. डॉ. पी.एस. साळुंखे यांनी करिअर कट्टा उपक्रमांतर्गत उपलब्ध विविध संधींचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, यामुळेच असे कार्यक्रम महाविद्यालयामार्फत राबविले जातात, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचलन डॉ. सचिन गोवर्धने तर आभार विद्यार्थी अतुल शिंदे यांनी मानले.

Hello Dhule
Page No. 2 Dec 27, 2021
Powered by: erelego.com

# साहसी व्यक्तीच उत्तम उद्योजक बनू शकतो : प्रा.डॉ.सोनवणे

**साक्री, दि.२५ (प्रतिनिधी) – योजकता, साहस आणि जोखीम स्विकारण्याची धमक ज्यात असते तो उत्तम उद्योजक बनू शकतो असे मत महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील प्रा.डॉ.ए.पी. सोनवणे यांनी व्यक्त केले.**

विद्या विकास मंडळाचे सि.गो. पाटील महाविद्यालय साक्री येथे करियर कट्टा उपक्रमा अंतर्गत एनसीसीच्या विद्यार्थ्यांना उद्योजकीय कौशल्य या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रमा प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.पी.एस. साळुंखे होते. प्रा.डॉ.निकम, महाविद्यालयीन करियर कट्टा समन्वयक प्रा.डॉ.एस.आर. गोवर्धने प्रसंगी उपस्थित होते. यशस्वी उद्योजक होण्यासाठी हार्ड व सॉफ्ट ही प्रमुख कौशल्य जवळ असणे आवश्यक आहे असे मत डॉ.सोनवणे यांनी व्यक्त केले. महाविद्यालयीन करियर कट्टा समन्वयक प्रा.गोवर्धने यांनी आपल्या प्रास्ताविकतेत करियर कट्टा उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधींविषयी ज्ञान अवलोकन होण्यास हा करिअर कट्टा पोषक आहे असे सांगितले अध्यक्षीय समारोपात प्रा.साळुंखे यांनी करियर कट्टा उपक्रमाअंतर्गत उपलब्ध विविध संधींचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा यामुळेच असे कार्यक्रम महाविद्यालयामार्फत राबविले जातात असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचलन डॉ.गोवर्धने तर आभार विद्यार्थी अतुल शिंदे यांनी केले. प्रसंगी कार्यक्रमास महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

10. दिनांक २८/१२/२०२१ वार मंगलवार विद्यापीठ संशोधन समितीची महाविद्यालयातील **करिअर कट्टा** या उपक्रमास भेट




समिती सदस्य प्रा.डॉ.अनिल पाटील, प्रा डॉ.राम पेटारे

समवेत प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे, प्रा.डॉ.एस.एस.पटोले,

प्रा.डॉ.लहू पवार, प्रा.डॉ.डी.एस.चव्हाण

विभागीय समन्वयक प्रा. डॉ.सचिन नांद्रे

महाविद्यालयीन समन्वयक प्रा. डॉ.एस.आर.गोवर्धने

11. आज दिनांक **३१/१२/२०२१ रोजी महाविद्यालयातील १७ विद्यार्थी करिअर कट्टा** या उपक्रमास जॉईन आहेत.

12. महाविद्यालयातील **करिअर कट्टा या** उपक्रमात सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात **एक स्वतंत्र अभ्यास कक्ष** उपलब्ध करून देण्यात आला आहे शिवाय त्यात **संगणक व इंटरनेट सुविधा** असून कक्षात वेगवेगळ्या **स्पर्धा परीक्षांविषयीची पुस्तके, मासिके, व सराव प्रश्नपत्रिका आणि वर्तमानपत्रे** उपलब्ध करून दिली जातात.


धन्यवाद